### राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र :५३६/२०२१/नाशिक**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| श्री. बहाउद्यीन हसन शेख,<br>रा. प्लॉट नं. १४,<br>ईकरा हायस्कुलजवळ, न्यू अलमास पार्क,<br>गोविंदपुरा, अहमदनगर,<br>ता.जि. अहमदनगर, | नायब तहसिलदार (सामान्य प्रशासन),<br>विभागीय आयुक्त कार्यालय,प्रशासकीय इमारत,<br>इंडिया सिक्युरिटी प्रेस समोर,<br>नाशिकरोड, ता.जि.नाशिक |

**सुनावणी दिनांक ३०/०१/२०२४**

तक्रारदार यांनी दिनांक १५/०९/२०२१ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक ३०/०१/२०२४ रोजी आयोजित सुनावणीसाठी तक्रारदार अनुपस्थित असून विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

२) तक्रारदार यांनी दिनांक १५/०९/२०२१ रोजीच्या तक्रार अर्जात असे नमुद केले आहे की, आयोगाच्या आदेशानुसार अपूर्ण माहिती दिली आहे.

३) आयोगाने द्वितीय अपील क्रमांक १६३९/२०१९/नाशिक वरील निर्णय दिनांक ०६/०५/२०२१ रोजी पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिकरोड, श्री. अनिल रतीलाल चव्हाण यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २७/०३/२०१९ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी.

४) सुनावणीवेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असे नमूद केले की, आयोगाने द्वितीय अपील क्रमांक १६३९/२०१९/नाशिक संदर्भात दिनांक ०६/०५/२०२१ रोजी दिलेल्या आदेशानुसार तक्रारदार यांना दि. ०८/०९/२०२१ रोजी १ ते ८५ पानांची माहिती रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन दिलेली आहे.

५) सुनावणीदरम्यानचा युक्तीवाद व आयोगासमोर उपलब्ध असलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, आयोगाच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदारास दि. ०८/०९/२०२१ च्या पत्रान्वये एकुण १ ते ८५ पानांची त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती रजिस्टर पोस्टाने पुरविली आहे. आजच्या सुनावणीस तक्रारदार अनुपस्थित असल्याने कोणती माहिती मिळाली व कोणती माहिती मिळाली नाही याबाबत कोणताही

उलगडा होऊ शकला नाही. तसेच त्यांना माहितीमध्ये स्वारस्य दिसून येत नाही. त्यामुळे सदर तक्रार पुढील चौकशी योग्य नाही.

**आदेश**

प्रस्तुत तक्रार क्रमांक ५३०/२०२१/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

जावक क्र. ६५८ 2 6 MAR 2024